# जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, औरंगाबाद

ग्राहक तक्रार क्र. 455/2023
दाखल दिनांक 02/11/2023
तक्रार निकाल दिनांक : 07/08/2024
कालावधी- 00 वर्ष 09 महिने 05 दिवस

**गणपूर्ती**

**श्रीमती. शिल्पा एस. डोल्हारकर, अध्यक्षा**
**श्री. गणेशकुमार आर. सेलूकर, सदस्य. श्रीमती जन्हवी ए. भिडे, सदस्या**

**आशिष घनश्यामदास वैष्णव**
वय 43 वर्षे, धंदा नोकरी,
रा. एन-9, घर नं. 127-2,
श्रीकृष्ण नगर सिडको, औरंगाबाद
मो. नं. 8888882644 ..........**तक्रारदार**

**विरुद्ध**

**फिजिक्सवाला खाजगी कोचिंग क्लासेस**
छ. संभाजीनगर विद्यापीठ प्लॉट नं. ई- 36/2,
चिकलठाणा, छ. संभाजीनगर महाराष्ट्र
मो. नं. 7019243492 .........**विरूद्ध पक्ष**

उपस्थिती
**तक्रारदार तर्फे** : **ॲड. जी. के. बोरुडे**
**विरुद्ध पक्ष तर्फे** : **ॲड. नेहा व्ही. कोळेकर**

**न्या य नि र्ण य**

**द्वारा - श्री. गणेशकुमार आर. सेलूकर, सदस्य**

विरुद्ध पक्ष यांनी अनुचित व्यापारी प्रथेचा अवलंब करून त्रुटींची सेवा दिली असल्या बाबत प्रस्तुत तक्रार कलम 35 ग्राहक संरक्षण कायदा 2019 अन्वये तक्रारदार यांनी सादर केली आहे.

**1. तक्रारदाराची थोडक्यात तक्रार -**

तक्रारदार यांचा मुलगा नामे ओम वैष्णव यांनी फिजिक्सवालाह यांच्या 11 वी जेईई-2024 या दोन वर्षाचे अभ्यासक्रमा साठी दिनांक 17/04/2023 रोजी प्रवेश घेतला. सदर दोन वर्षाचे अभ्यासक्रमा साठी विरूद्ध पक्ष यांनी रक्कम रू. 1,16,820/- एवढी फीस सांगीतली होती, परंतु सदर फीस वर सवलत (डिस्कांउट) देउन शेवटी रू. 96,000/- एवढी फीस दोन वर्षाचे अभ्यासक्रमा साठी आकाण्यात आली. या पैकी, तक्रारदार यांनी एकुन रू. 63,739/- भररणा केले आहेत.

तक्रारदार यांचे मुलाचे प्रवेशा प्रक्रीया पुर्ण झाल्या नंतर दिनांक 05/05/2023 रोजी प्रत्यक्ष आफ-लाईन क्लासेसला सुरूवात झाली. तक्रारदार यांचे मुलाचे प्रवेशाचे वेळी त्यास सकाळची बॅच देण्याचे ठरले होते. त्या प्रमाणे सुरूवातीस सकाळची (मॉर्निग) बॅच देण्यात आली होती. परंतु त्यानंतर तक्रारदार यांच्या मुलाला युनिक बॅच मध्ये घेण्यात आले. म्हणुन तक्रारदाराचे मुलाने त्यास संध्याकाळच्या बॅच मध्ये जाण्यास विरोध दर्शवीला. म्हणुन त्यास विरूद्ध पक्ष यांनी धमकावले. या मुळे तक्रारदार यांनी विरूद्ध पक्ष यांचे कडे भरणा केलेली संपुर्ण रक्कम रू. 63,739/- परत करण्याची वारंवार विनंती केली. परंतु विरूद्ध पक्ष यांनी सदर फीस परत करण्यास नकार दिला. म्हणुन सदरची तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी तक्रारीत फीस म्हणुन भरणा केलेली रक्कम रू. 63,739/- व मानसिक त्रासा पोट रू. 30,000/- व तक्रारीचा खर्च रू. 20,000/- मीळण्याची मागणी केली आहे. तक्रारदार यांनी तक्रारीचे पुष्टयार्थ कोचींग क्लासची फीस भरणा केल्याच्या पावत्या, व आधार कार्ड ची प्रत असे कागदपत्रे दाखल केले आहेत.

2. प्रस्तुत तक्रारीत प्राथमीक युक्तीवाद एकल्या नंतर तक्रार दाखल करण्यात आली व विरूद्ध पक्ष यांना नोटीस पाठवीण्याचे आदेश झाले. त्यानुसार विरूद्ध पक्ष यांना सुचना पत्र प्राप्त झाली म्हणुन प्रकरणात विरूद्ध पक्ष त्यांच्या विधिज्ञांमार्फत हजर झाले व विरूद्ध पक्ष यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले. सदर निवेदन मुदतीत असल्याने ते स्वीकारण्यात आले आहे.

3. **विरूद्ध पक्ष यांचा लेखी जवाब-**

विरूद्ध पक्ष यांनी तक्रारीतील काही मजकुर मान्य केला असून उर्वरीत संपुर्ण मजकुर नाकारला आहे. विरूध्द पक्ष यांनी हे मान्य केले आहे की, तक्रारदाराचा मुलगा नामे ओम आशिष वैष्णव यांनी दिनांक 17.10.2023 रोजी विरूद्ध पक्ष यांचे क्लासेस मध्ये JEE 2 वर्षे 11 वी आणि 12 वी इंग्रजी माध्यम, सकाळचे स्लॉट, करीता एकूण फी रु. 1,16,820 एवजी सवलतीसह फक्त रु.96,000 मध्ये प्रवेश निश्चित केला आहे. त्या पैकी तक्रारदार यांनी रू. 63,739/- दिले असल्याचे विरुद्ध पक्ष यांनी मान्य केले आहे.

विरुद्ध पक्ष यांनी असा बचाव घेतला की, दिनांक 17.04.2023 पासून बॅच सुरु झाल्या होत्या आणि निश्चित वेळापत्रका नुसार वर्ग घेतले गेले आणि त्यानुसार विद्यार्थ्यांनी निवडलेल्या स्लॉट नुसार वर्गांना हजेरी लावली. तक्रारदाराचा मुलगा ओम हा त्याच्या सोयीनुसार संध्याकाळच्या बॅचला 61 दिवस नियमितपणे उपस्थित राहिला होता. तक्रारदाराच्या मुलाने वर्गाची वेळ बदलण्यासाठी कधीही विनंती केली नाही किंवा कोणताही अर्ज दाखल केला नाही. तसेच विरुद्ध पक्ष यांनी तक्रारदाराच्या मुलाला कधीही धमकवले नाही. पुढे असे निवेदन केले की, प्रवेश/नोंदणी फॉर्म आणि माहितीपत्रकात परतावा धोरणाचा उल्लेख विरुद्ध पक्ष यांनी केला आहे. ज्यामध्ये 7 आठवडयाने जर विद्यार्थ्याने

त्यांच्या शिकवणीस उपस्थित न राहण्याचा आणि प्रवेश मागे घेण्याचा आपला हेतू व्यक्त केल्यास, नोंदणी शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही असे नमूद केले आहे. परताव्याची विनंती करण्यासाठी विद्यार्थ्याने परताव्याचे कारण नमूद करून लिखित स्वरूपात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. परताव्या साठी वरील अर्जाचा विचार परताव्याच्या धोरणा नुसार केला जातो. ज्यामध्ये प्रवेशाच्या तारखेपासून 6 आठवड्यांच्या आत परतावा देण्याचा उल्लेख आहे. तक्रारदाराच्या प्रवेश फॉर्म मधील परताव्याच्या धोरणा मध्ये खालील पद्धतीने फीच्या संरचनेचा परतावा स्पष्टपणे नमूद केला आहे.

बॅच सुरू होण्या पूर्वी फक्त शिकवणी तंत्रज्ञान शुल्क परत करण्या योग्य आहे. जर परतावा पहिल्या आठवड्यात लागू केला गेला असेल तर 5% वजावट, दुसऱ्या आठवड्यात 15% वजावट, तिसऱ्या आठवड्यात 30 % वजावटपात्र, चौथ्या आठवड्यात 50% वजापात्र, 5 व्या आठवड्यात 70%वाजवट, 6 व्या आठवड्यात 80% वजावट करण्या योग्य आणि 7 व्या आठवड्यात परत न करण्या योग्य राहील, असे नमूद केले आहे.

विरुद्ध पक्ष यांनी पुढे निवेदन केले की, तक्रारदाराने कधीही विरुद्ध पक्षाची भेट घेतली नाही, व रु. 63,739/- एवढी रक्कम परत करण्याची कधीही मागणी केली नाही. पुढे असे निवेदन केले की, शुल्क परत करण्यासाठीचा पात्र कालावधी आधीच संपला होता, म्हणून तक्रारदाराने भरलेले शुल्क परत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. सेवेत कमतरता केली असल्याची बाब विरुद्ध पक्ष यांनी नाकारली असून, पुढे अशी प्रार्थना केली की, तक्रारदाराची तक्रार खर्चासह फेटाळण्यात यावी.

विरूध पक्ष यांनी त्यांचे बचावार्थ लेखी जवाबासह तक्रारदाराचा मुलगा ओम वैष्णव यांचा प्रवेश नोंदणी अर्ज, शिकवणी शुल्क आराखडा (Fees Structure) व प्रवेशाच्या अटी

शर्ती, तक्रारदार यांनी शुल्क भरणा केल्याची पावती, व तक्रारदाराचा मुलगा ओम याचा शिकवणीचा उपस्थीती पट असे दस्त दाखल केले आहेत.

4. उभय पक्षांची कैफियत आणि दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे निश्चित होतात, त्यावर या आयोगाचा कारणासह निष्कर्ष पुढील प्रमाणे -

| अनु क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1. | तक्रारदार हा विरुद्ध पक्ष यांचा ग्राहक असल्याचे सिद्ध होते काय? | होय |
| 2. | विरुद्ध पक्ष यांनी तक्रारदारास अनुचित व्यापार पद्धतीचा अवलंब करून त्रुटींची सेवा दिली आहे काय ? | होय |
| 3. | तक्रारीतील मागणीनुसार कोणताही आनुतोष मिळण्यास तक्रारदार पात्र आहे काय ? | होय |
| 4. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

5. **का र ण मि मां सा**

प्रस्तुत प्रकरणात निर्विवाद बाबी अश्या आहेत की, तक्रारदार यांचा मुलगा नामे ओम याचा प्रवेश विरुद्ध पक्ष यांच्या दोन वर्षाच्या शिकवणी वर्गासाठी करण्यात आला होता. त्या करिता एकूण 96,000/- अशी फिस ठरविण्यात आली, आणि तक्रारदाराने 63,000/- रू. भरणा केले आहेत. परंतु वादाचा मुद्दा असा आहे की, तक्रारदाराचा मुलागा किती दिवस शिकवणीस उपस्थित होता ? त्यास सोईची बॅच उपलब्ध नसल्यास, प्रवेश रद्द करून शिकवणी शुल्क परत करणे ही विरुद्ध पक्ष यांची जबाबदारी आहे काय? विरुद्ध पक्ष यांच्या प्रवेश फॉर्म व माहिती पत्रका नुसार राबविलेले परतावा धोरण योग्य व

(5) (vii) नुसार तक्रारदार यांना त्यांचे मुलाचे वतीने सदरील ग्राहक तक्रार दाखल करण्याचे आधिकार प्राप्त होतात. सबब तक्रारदार हे विरूद्ध पक्ष यांचे "ग्राहक" होत असल्याचे स्पष्ट होते. करीता मुद्दा क्र. 1 चा निष्कर्ष होकारार्थी ठरवीण्यात येतो.

**7. मुद्दा क्र. 2 व 3 -**

प्रस्तुत प्रकरणात मुद्दा क्र. 2 व 3 एकमेकांशी संलग्न असल्याने एकत्रीतपणे विचारात घेण्यात येत आहेत. तक्रारदार यांनी विरूद्ध पक्ष यांच्या शिकवणी ची भरणा केलेली संपुर्ण शुल्क रू. 63,739/- परत मीळण्याची मागणी वारंवार केली आहे असे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. एकंदरीत संपुर्ण तथ्यांचा विचार केला असता, तक्रारदाराचे मुलाचा विरूद्ध पक्ष यांचे कडील अभ्यासक्रमाचा प्रवेश रद्द करून, भरणा केलेले शुल्क तक्रारदारास परत करण्यास विरूद्ध पक्ष जबाबदार आहे काय असा प्रश्न उपस्थीत होतो.

तक्रारदार यांचे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, तक्रारदार यांचे मुलाची बॅच सकाळची असताना विरूद्ध पक्ष यांनी संध्याकाळची बॅच देउन असुविधा निर्माण केली म्हणुन तक्रारदाराचे मुलास शिकवणी करीता उपस्थीत राहात येत नसल्याने त्याचा प्रवेश रद्द करून भरणा केलेली रक्कम रू.63,739/- विरूद्ध पक्ष यांनी परत करणे आवश्यक असताना देखील, शुल्काचा परतावा देण्यास नकार देउन अनुचीत व्यापारी प्रथेचा अवलंब केला, व त्रुटीची सेवा दिली आहे.

या उलट विरूद्ध पक्ष यांचे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, तक्रारदार यांनी कधीही त्यांचे मुलाचा प्रवेश रद्द करून शुल्क परत करण्याची विनंती केली नाही. किंवा त्या बाबत कोणताही लेखी अर्ज केला नाही. म्हणुन त्रुटीची सेवा देण्याचा प्रश्नच येत नाही. पुढे असा युक्तीवाद केला की, तक्रारदार यांचा मुलगा नामे ओम यांनी दिनांक 17/04/2023 पासुन 61 दिवस शिकवणी वर्गास उपस्थीत राहुन अभ्यासक्रम केला आहे.

विरूद्ध पक्ष यांचे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, या शिवाय प्रवेशाचे वेळीच विरुद्ध पक्ष यांनी तक्रारदारास असे स्पष्ट केले होते की, विरुद्ध पक्ष यांचे Refund Policy नुसार प्रवेशा पासुन 7 आठवडया नंतर जर प्रवेश रद्द करावयाचा असेल तर कोणतीही शुल्क परत मीळणार नाही. असे असताना तक्रारदाराचे मुलाने एकुन 61 दिवस म्हणजेच दिनांक 10/05/2023 ते 12/09/2023 पर्यंत शिकवणीत उपस्थीत राहुन अभ्यासक्रम केला आहे. म्हणुन तक्रारदारास कोणतीही अनुचीत व्यापारी प्रथा अवलंबीली नाही, व त्रुटीची सेवा दिली नाही.

एकंदरीत संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे स्पष्ट होते की, तक्रारदाराचे मुलाने केवळ 61 दिवसच शिकवणीस उपस्थीती दर्शवीली, व दि. 12/09/2023 नंतर तो शिकवणीस उपस्थीत राहु शकला नाही. तक्रारदार यांचे म्हणने आहे की, त्याचे मुलास सकाळची बॅच देण्यात आली असताना बॅच मध्ये बदल करून विरूद्ध पक्ष यांनी संध्याकाळच्या बॅच मध्ये येण्यास सांगुन असुविधा केली. म्हणुन तक्रारदार यांचे मुलास शिकवणीस हजर राहता येत नाही. म्हणुन प्रवेश रद्द करून शुल्क परतावा करण्याची मागणी केली. अभीलेखाचे आवलाकन केले असता तक्रारदाराचे मुलास कोणत्या बॅच साठी प्रवेश देण्यात आला या बाबत कोणताही उल्लेख प्रवेश फॉर्म वर नाही. सदर विदयार्थी नामे ओम वैष्णव यास कोणत्या बॅच मध्ये प्रवेशीत करण्यात येत आहे ही बाब प्रवेशाचे वेळी लिखीत स्वरूपात, विरूद्ध पक्ष यांनी तक्रारदारास अथवा विदयार्थ्यास स्पष्ट करणे आवश्यक होते. परंतु विरूद्ध पक्ष यांनी सादर केलेल्या कोणत्याही दस्तां मध्ये ओम वैष्णव यास कोणत्या बॅच मध्ये प्रवेश दिला होता, हे स्पष्ट केले नाही. केवळ उपस्थीती पटा वरून हे स्पष्ट होत नाही ही त्यास कोणत्या बॅच साठी प्रवेश निश्चीत केला होता. त्यामुळे जर विदयार्थ्यास शिकवणी करीता वेळेची असुविधा होत असेल तर अशा

कारणां करीता शिकवणी रद्द करून इतर सोईचे ठिकाणी शिकवणी सुरू करणे कोणत्याही प्रकारे अयोग्य ठरू शकत नाही. या शिवाय इतर कोणत्याही कारणांमुळे विदयार्थ्यास शिकवणी सोडून देण्याचा, किंबहुना वेळ आली तर प्रवेश रद्द करून भरणा केलेली शुल्क परत मीळण्याचा देखील अधिकार आहे. तथापी, शिकवणी बाबत विदयार्थी असमाधानी असेल तर त्यास त्याचा प्रवेश रद्द करून घेण्याचा व शुल्क परत मिळण्याचा अधिकार प्राप्त होतो. आता प्रश्न उपस्थीत होतो की, विरूद्ध पक्ष यांची रिफंड पॉलीसी असताना, विदयार्थ्याचा शिकवणीचा प्रवेश रद्द करून जमा केलेली शुल्क परत मीळण्याचा अधिकार तक्रारदारास किंवा विदयार्थ्यास प्राप्त होतो काय ?

विरूद्ध पक्ष यांनी दाखल केलेल्या अभिलेखाचे आवलोकन केले असता, त्या पैकी, प्रवेश नोंदणी अर्ज सह दिलेल्या अटी शर्ती नुसार रिफंड पॉलीसी प्रमाणे हे स्पष्ट होते की, परताव्याची विनंती करण्यासाठी विद्यार्थ्याने परताव्याचे कारण नमूद करून लिखित स्वरूपात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच परतावा पहिल्या आठवड्यात लागू केला गेला असेल तर 5% वजावट, दुसऱ्या आठवड्यात 15% वजावट, तिसऱ्या आठवड्यात 30 % वजावटपात्र, चौथ्या आठवड्यात 50% वजापात्र, 5 व्या आठवड्यात 70%वाजवट, 6 व्या आठवड्यात 80% वजावट करण्या योग्य आणि 7 व्या आठवड्या नंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क परतावा परत मिळू शकणार नाही, असे नमूद केले आहे. या शिवाय विरुद्ध पक्ष यांचा बचाव असा आहे की, तक्रारदार यांना या बद्दल प्रवेशाचे वेळीच सर्व कल्पना दिली असून, ही बाब मान्य करूनच तक्रारदार यांनी त्यांच्या मुलाचा प्रवेश विरुद्ध पक्ष यांच्या शिकवणी साठी घेतला असल्याने, व तक्रारदार यांच्या सह्या नमूद अटी शर्ती वर आहेत. म्हणून तक्रारदारावर ही बाब बंधनकारक असून, त्यांना या अटी शर्ती प्रमाणे कोणताही परतावा मिळण्याचा अधिकार राहत नाही.

या परिस्थितीत मा. राष्ट्रीय आयोग यांच्या कडील प्रकरण **ब्रिलियंट टयुटोरियल्स प्रा. लि. विरूद्‌ध अश्वनी वर्मा 2011 सि.टी.जे. 288 (सी.पी.)** व **सहेगल स्कुल ऑफ कॉम्पीटीशन विरूद्‌ध दलबीर सिंग 2009 (3) सी.पी.सी. 187** व एफ.आय आय टी जे ई. ई. लि. विरूद्‌ध मिनाथी राथ व ईतर या सर्व न्याय य निर्णयांचा आधार घेणे उचीत ठरते.

**In Brilliant Tutorials Pvt. Ltd V/s. Ashwani Verma, 2011 CTJ 288 (CP) (NCDRC)** *held that, the principle laid down by the Apex Court would apply with equal force to the training institute who collect fees in advance, though not due, in order to prepare the students for various examinations. Charging fees in advance beyond the current semester/year would certainly amount to unfair trade practice.*

*It is also held that, where a complaint was opposed interalia, on the ground that, the fees paid were non-refundable and the respondent was bound by its terms and conditions. The revision petition filed by the institute was also dismissed by the Hon'ble National Commission.*

*Similarly in the case of* ***Sehgal School of Competition vs Dalbir Singh, 2009 (3) CPC 187*** *it is held that, there exist such condition in the brochure issued by the petitioner from whose side an argument was advanced that, fees was non-refundable or non-transferable under any circumstances. His contention was not accepted by the Ld. District Forum which held that, any clause saying that fees once paid will not be refunded is unconscionable and unfair and therefore not enforceable. The appeal filed by the petitioner was dismissed and the revision petition was also dismissed by Hon'ble National Commission.*

***In FIIT JEE Ltd v/s Dr. Minathi Rath & others (NCDRC)*** *- held that, coaching institutions providing educational services for consideration fall under the purview of the C. P. Act, 2019. It was ruled that, fees once paid could be refunded after deducing non-refundable service charges for the unattended portion of the course.*

यावरून प्रस्तुत प्रकरणातील वस्तुस्थिती, पुरावे आणि कायदेशीर न्याय निणर्यांच्या संदर्भ दाखल्यांच्या अनुशंगाने, हे स्पष्ट होते की, विरूद्ध पक्ष यांनी तक्रारदार यांचे मुलाचे प्रवेशाचे वेळी ज्या अटी शर्ती घालुन प्रवेश दिला, किंवा उभय पक्ष यांचे मध्ये झालेल्या शुल्क परताव्याचे करारातील अवैध अटी शर्ती नुसार संमतीने रिफंड पॉलीसी ठरवीली असली तरी त्या अटी शर्तीच मुळात अनुचित व्यापारी प्रथेचा अवलंब करणा-या आहेत असे मा. राष्ट्रीय आयोगाचे वर नमूद संइर्भ न्यायनिर्णयावरुन दिसून येते. त्यामुळे विरूद्ध पक्ष परताव्याची रक्कम देणे लागत नाही असा त्यांचा युक्तीवाद कोणत्याही परीस्थीतीत ग्राहय धरता येत नाही. या द्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, शिक्षणा सारख्या पवित्र कार्यात शैक्षणीक संस्था किंवा शिकवणी वर्गानी नफा कमावण्याचा उद्देश ठेवुन व्यवसाईक अस्थापनांसारखे वागणे योग्य ठरत नाही. अशा खाजगी शैक्षणिक संस्थां अथवा शिकवणी त्यांचे कडील अभ्यासक्रमाच्या जागा, त्यांनी विकण्याच्या उद्देशाने, लिलावगृहे बनुन नफा कमावण्याचे साधन ठरू नये या साठी सुरक्षा प्रदान करणे आवश्यक असते.

म्हणुन प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार यांचे मुलाची शिकवणी बंद करून अनेक वेळा परतावा देण्याची विनंती करून देखील, विरूद्ध पक्ष यांनी त्यांचे कडे अगाउची जमा करून घेतलेली दोन वर्षाची शिकवणीची फीस/शुल्क तक्रारदारास परत केली नाही ही वस्तुस्थीती आहे. विरूद्ध पक्ष यांनी फीसचा परतावा न करता, फीस परत देण्यास नकार दिल्यानेच तक्रारदारास सदरची तक्रार दाखल करावी लागली. अन्यथा तक्रारदार यांनी विनाकारण तक्रार दाखल करण्याचे कष्ट घेतले नसते. केवळ लिखीत अर्ज करुन विरुध्द पक्ष फीसचा परतावा तक्रारदास मिळणार असल्यास त्यांनी ही तक्रार दाखलच केली नसती. जेव्हा दोन वर्षा करीताची फीस 96,000 ठरली असताना पहील्याच सहा महीन्यातच दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाची जास्ती जास्त फीस वसुल करून घेणे ही बाब अनुचित व्यापारी प्रथेचा

अवलंब करणारीच आहे. शिकवणी सोडून देण्याचे तक्रारी मधील आणखी एक कारण म्हणजे तक्रारदारास विरूद्ध पक्ष यांनी आकारलेली फीस परवडत नाही असे असल्याचे तक्रारीत नमूद आहे. तेव्हा तक्रारदार त्याचे मुलाचे शैक्षणीक वर्ष वाया घालवु शकत नाही. त्यास इतर काही मार्ग अवलंबीण्या करीता जर प्रवेश रद्द करून हवा असल्यास विरूद्ध पक्ष यांनी व्यवसाईक दृष्टीकोण बाजुला ठेवुन विदयार्थ्याच्या शैक्षणीक भवितव्याचा विचार करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणात विरूद्ध पक्ष यांनी नफा कमावण्याचे उद्देशा शिवाय कोणताही विचार केला नाही. त्यामुळेच आगाऊची घेतलेले शुल्क परत करण्यास नकार दिला. म्हणुन तक्रारदार यांना विरूध्द पक्ष यांनी अनुचीत व्यापारी प्रथेचा अवलंब करून त्रुटींची सेवा दिली आहे हे सिद्ध होते असे आमचे मत आहे.

तक्रारदार यांचे मुलाने काही दिवस म्हणजेच 61 दिवसांसाठी विरूद्ध पक्ष यांचे कडून शिकवणी घेतली आहे हे उपस्थीती पटावरून स्पष्ट होते. म्हणुन दोन वर्षा पैकी केवळ 61 दिवसच विदयार्थ्याने शिकवणी घेतल्याने, उर्वरीत कालावधीची फीस/शुल्क विरूद्ध पक्षाने कोणतीही सेवा दिली नसताना ठेवुन घेणे अनुचित व्यापारी प्रथेचा अवलंब करणे होय. म्हणुन एकुन हिशोब केला असता, हे स्पष्ट होते की, दोन वर्षाचे अभ्यासक्रमा करीता 96,000/- फीस आकारली असता, वर्षाला 48,000/- व महीन्याला 4000/- या प्रमाणे आकारण्यात आली आहे. म्हणुन या हिशोबाने तक्रारदाराने जमा केलेली एकुन फीस/शुल्क रू. 63,739/- मधुन 61 दिवसांची म्हणजेच 10/05/2023 ते 12/09/2023 या कालावधीची एकुन चार महीण्याची 4000/- प्रती माह प्रमाणे एकुन 16000/- रू. शुल्क वजा करून, उर्वरीत संपुर्ण शुल्क रक्कम रू. 47,739/- तक्रारदारास परत करणे विरूद्ध पक्ष यांची जबाबदारी आहे असे आमचे मत आहे. न्यायाचा समतोल राखण्या साठी सदरचा हिशोब करून उभय पक्षांची जबाबदारी निश्चीत करण्यात आली आहे. म्हणुन तक्रारदार हा

त्यांचे तक्रारीतील मागणी पैकी रक्कम रू. 47,739/- विरूद्ध पक्ष यांचे कडून मीळण्यास पात्र ठरतो असे आमचे मत आहे. या शिवाय तक्रारदारास विरूद्ध पक्ष यांनी शुल्क परतावा न केल्याने व तक्रार दाखल करण्यास भाग पाडल्याने झालेल्या मानसीक शारीरीक त्रासा पोटी 5000/- व तक्रारीचा खर्चासाठी 3000/- अशी नुकसान भरपाई देणे उचीत ठरते. करीता मुद्दा क्र. 2 व 3 चा निष्कर्ष होकारार्थी ठरवीण्यात येत आहे.

**8. मुद्दा क्र. 4**

मुददा क्र. 1 ते 3 चा निष्कर्ष विचारात घेता, तक्रारदार यांची तक्रार सिद्ध होत असल्याने मंजुर करणे न्यायाचे आहे, सबब मुददा क्र. 4 बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**अं ती म आ दे श**

1. तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येते.

2. विरूद्ध पक्ष यांना आदेशीत करण्यात येते की, विरूद्ध पक्ष यांनी अनुचित व्यापारी प्रथेचा अवलंब करून, त्रुटीची सेवा दिली म्हणुन, विरूद्ध पक्ष यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी तक्रारदाराचा मुलगा ओम वैष्णव याच्या दोन वर्षाच्या शिकवणी अभ्यासक्रमासाठी जमा करून घेतलल्या शुल्क/फीस रू.63,739.00/- पैकी,16,000/- वजा करून उर्वरीत रक्कम रू. 47,739.00/- एवढी रक्कम तक्रारदारास तक्रार तारखे पासुन म्हणजेच दिनांक 02/11/2023 पासुन द.सा.द.शे. 7 टक्के व्याजा सह परत करावी.

3. विरूध्द पक्ष यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी तक्रारदारास झालेल्या मानसीक, शारीरीक त्रासा पोटी 5000/- व तक्रारीचा खर्च रू. 3000 असे एकुन 8000/- नुकसान भरपाई दयावी.

4. विरूद्ध पक्ष यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या आदेशाची प्रत मीळाल्या पासुन 45 दिवसांचे आत सदर आदेशाची पुर्तता करावी अन्यथा त्यापुढे वरील सर्व देय रक्कमेवर अतीरीक्त द.सा.द.शे. 2 टक्के व्याज देय राहील.

5. उभय पक्षांना निकालपत्राच्या प्रथम प्रती निःशुल्क देण्यात याव्यात.

6. या व्यतीरीक्त कोणतेही आदेश नाहीत.

ठिकाण :- औरंगाबाद (संभाजीनगर)

| श्रीमती. जान्हवी ए.भिडे | श्री. गणेशकुमार आर. सेलूकर | श्रीमती. शिल्पा एस. डोल्हारकर |
|---|---|---|
| सदस्या | सदस्य | अध्यक्षा |